# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २०८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.१८ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## मुंबईत मतदार यादीत तब्बल ४ लाख ७८ हजार ३०८ मृत मतदार; किरीट सोमय्यांनी उघड केली धक्कादायक आकडेवारी

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- मुंबईतून एक अत्यंत संतापजनक आणि देशाच्या सुरक्षेला सुरुंग लावणारी माहिती उघड झाली आहे. मुंबई शहर आणि उपनगराच्या मतदार याद्यांमध्ये तब्बल ४ लाख ७८ हजार ३०८ मृत मतदारांची नावे अद्यापही तशीच असल्याचे भाजपाचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी पुराव्यानिशी चव्हाट्यावर आणले आहे. मात्र, हा केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा नाही. तर या मृतांच्या ओळखीचा वापर करून बेकायदेशीर बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना बोगस मतदान करवून मुंबईवर ताबा मिळवण्याचे भयंकर षडयंत्र तर शिजत नाही ना? असा खळबळजनक सवाल आता उपस्थित झाला आहे.

नेहमी ईव्हीएमवर खापर फोडणाऱ्या आणि लोकशाही धोक्यात असल्याचा कंठशोष करणाऱ्या विरोधकांना या पावणेपाच लाख बोगस मतदारांचा सुळसुळाट कसा दिसत नाही? मतांच्या जोगव्यासाठी हे राजकीय पक्ष आता बांगलादेशी घुसखोरांच्या मदतीने निवडणुका हायजॅक करणार का, असा सवालही सोमय्या यांनी उपस्थित केला आहे.

# एफडीएकडून झालेली कारवाई अंगलट

## दुकानदाराला ५ लाख द्यावे लागणार, मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश

पुणे दि.१७ (प्रतिनिधी)- पुण्यातील एका मिठाईच्या दुकानाचा अन्न परवाना निलंबित केल्यानंतर फेरतपासणीत तब्बल ९८ टक्के नियमांचे पालन झाल्याचे स्पष्ट झाले, तरीही दुकानाचा परवाना पूर्ववत न केल्याने मुंबई उच्च न्यायाल यानेमहाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाल ा फटकारले. न्यायालयाने एफडीएला दुकानाचा परवाना पूर्ववत करण्याचे आणि मालकाला नुकसानभरपाई म्हणून ५ लाख रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणावर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

गुरुनानक डेअरी अँड स्वीट्स या पुण्यातील दुकानावर अन्न विषबाधेच्या तक्रारीनंतर एफडीएनेने कारवाई केली होती. तपासणीदरम्यान दुकानातील स्वच्छता आणि देखभालीबाबत काही त्रुटी आढळल्या. त्यामुळे १२ जून रोजी दुकानाचा अन्न परवाना निलंबित करण्यात आला. यानंतर दुकानाने त्रुटी दूर करण्यासाठी एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याशी संपर्क साधला. ९ जुलै रोजी दुकानाने सर्व त्रुटी दूर केल्याचा अहवाल सादर केला. त्यानंतर एफडीएच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा दुकानाची तपासणी केली.

या फेरतपासणीत दुकानाला ३६ पैकी ३५ गुण मिळाले, म्हणजेच दुकानाने अन्नसुरक्षा नियमांचे तब्बल ९८ टक्के पालन केले असल्याचे समोर आले. मात्र, तरीही एफडीएने दुकानाचा परवाना पूर्ववत केला नाही. त्यामुळे दुकानाच्या मालकाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने एफडीएच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ९८ टक्के नियमांचे पालन झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर परवाना तातडीने पूर्ववत करायला हवा होता. ९८ टक्के नियमांचे पालन झाल्यानंतरही तुम्ही याचिका दाखल करा असे सांगता, हे काय चालले आहे? हा नागरिकांचा छळ आहे का?' अशा शब्दांत न्यायालयाने एफडीएला फटकारले.



एफडीएच्या कारवाईमुळे हे दुकान तब्बल ३४ दिवस बंद होते. या काळात सुमारे ८.७४ लाख रुपयांचे उत्पन्न बुडाल्याचा दावा दुकानाच्या मालकाने न्यायालयात केला. दुकानाच्या वकिलांनी हेही सांगितले की, एफडीएच्या तपासणी अहवालात दुकानातील कोणत्याही खाद्यपदार्थामुळे एखादा विशिष्ट आजार किंवा आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे नमूद केलेले नाही. सर्व बाबींचा विचार केल्यानंतर उच्च न्यायालयाने दुकानाचा परवाना निलंबित करण्याचा आदेश रद्द केला. तसेच दुकानाला पुन्हा व्यवसाय सुरू करण्याची परवानगी दिली. याशिवाय, एफडीएने दुकानाच्या मालकाला ३० दिवसांच्या आत ५ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, असे आदेश दिले.

## मुंबई हायकोर्ट लिपिक टंकलेखन परीक्षेत महाराष्ट्रभर तांत्रिक गोंधळ, अभिजित दिपकेंचा सरकारला ८ दिवसांचा अल्टिमेटम

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- मुंबई हायकोर्टाच्या लिपिक टंकलेखन कौशल्य परीक्षेत रविवारी महाराष्ट्रभर मोठा तांत्रिक गोंधळ उडाला. परीक्षा घेणाऱ्या खासगी कंपनीने नादुरुस्त कीबोर्ड दिले. तसेच सर्व्हर डाऊन आणि पेपर आपोआप सबमिट होणे, असे प्रकार घडले. यामुळे संतप्त उमेदवारांनी संभाजीनगर-मधील परीक्षा केंद्रांबाहेर ठिय्या आंदोलन केले. या प्रकाराची हायककोर्टाच्या रजिस्ट्रारनेही दखल घेतली असून पुढील कार्यवाहीबाबत कळवले जाईल, अशी नोटीस जारी केली आहे.

दरम्यान, कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी सुराणानगर येथील बायटेझ टेक्नॉलॉजीज या परीक्षा केंद्रावर धाव घेत त्यांनीही विद्यार्थ्यांसोबतच ठिय्या मांडला. रात्री उशिरा घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य सरकारला परीक्षा यंत्रणा सुधारण्यासाठी आठ दिवसांचा अल्टिमेटम दिला असून यानंतर राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही दिला. रविवारी सकाळी १० ते ११.१५ या पहिल्या सत्रात बायटेझ टेक्नॉलॉजीज, एमजीएम आणि सेव्हन हिल येथील परीक्षा केंद्रांवर हा संतापजनक प्रकार उघडकीस आला.

२० गुणांच्या या परीक्षेत अनेक संगणकांच्या स्क्रीन पिवळ्या-गुलाबी दिसत होत्या. काहींचे माऊस चालत नव्हते, तर स्पेस बटण दाबताच सिस्टिम आपोआप लॉगआऊट होत होती. अवघ्या पाच मिनिटांत अनेकांचे पेपर सबमिट झाले. त्यामुळे पहिल्या बॅचमधील सर्व उमेदवार एकाच वेळी अनुत्तीर्ण होतील, असा आक्षेप घेत उमेदवारांनी हायकोर्टाच्या प्रबंधकांना निवेदन दिले.

मनसेचे अमित ठाकरे यांनीही फोनवरुन मुलांशी संवाद साधला. काँग्रेसच्या दीक्षा पवार, एसएफआयच्या मनीषा बल्लाळ, अरुण मते या विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी आंदोलन स्थळी आले होते. पोलिस उपायुक्त रत्नाकर नवले यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. राज्यातील १,३३२ लिपिक पदांसाठी ११,६११ विद्यार्थी टायपिंग परीक्षेसाठी पात्र ठरले. संभाजीनगरमध्ये ३ केंद्रांवर २,९०० उमेदवार होते.

## भाजपाची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर!

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)- आगामी राजकीय घडामोडी आणि संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांदरम्यान, भारतीय जनता पक्षाने (भाजपा) आपल्या केंद्रीय संघटनरचनेत अत्यंत महत्त्वाचे फेरबदल केले आहेत. पक्षाध्यक्ष नितीन नबीन यांनी जाहीर केलेल्या नव्या केंद्रीय कार्यकारिणीत माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी आणि माजी राष्ट्रीय सरचिटणीस राम माधव यांचे पक्षाच्या मुख्य नेतृत्वात मोठे पुनरागमन झाले आहे. दुसरीकडे, पक्षाचे आयटी सेलप्रमुख अमित मालवीय यांची या पदावरून गच्छंती करण्यात आली आहे.

सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या नव्या अधिसूचनेनुसार स्मृती इराणी यांची भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीनंतरच्या बदलत्या समीकरणांनंतर स्मृती इराणी यांच्याकडे राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा संघटनात्मक कामाची मुख्य धुरा सोपवण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांच्याकडे पक्षाच्या 'राष्ट्रीय कोषाध्यक्ष'पदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच राम माधव यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून नवी नियुक्ती करण्यात आली असून, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी आपले पद कायम राखले आहे.

या फेरबदलातील सर्वात लक्षवेधी निर्णय म्हणजे भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांची गच्छंती. त्यांच्या जागी आता छत्तीसगडचे दीपक म्हस्के यांची भाजपच्या राष्ट्रीय आयटी सेलच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या प्रसारमाध्यम विभागाची धुरा खासदार अनिल बलूनी यांच्याकडेच कायम ठेवली आहे.

## पाकिस्तान, बांगलादेश पुन्हा भारतात सामील होतील; योगगुरू बाबा रामदेव यांचे भाकीत

रायपूर दि.१७ (वृत्तसंस्था)- पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान पुन्हा भारतात सामील होतील, थोडा धीर धरा... असा दावा योगगुरू स्वामी रामदेव यांनी केला आहे. ते छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे स्वामी विवेकानंद विमानतळावर पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी हिंदूंसंदर्भात केलेल्या वक्तव्यावर पलटवार केल ा.

पाकिस्तानच्या स्वातंत्र्यदिनी तेथील राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी, भारतातील 'अखंड भारत' संकल्पनेवर टीका केली होती. याला प्रत्युत्तर देताना बाबा रामदेव म्हणाले, 'भारतात हिंदू, मुस्लीम अथवा ख्रिश्चन धर्म धोक्यात नाही, तर तर देशाचा सन्मान आणि प्रतिष्ठा धोक्यात आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये हिंदूंवर झाल ेला अत्याचार हा मानवी इतिहासातील सर्वात मोठ्या अत्याचारांपैकी एक आहे. यामुळे अशा लोकांनी वक्तव्ये करताना भान ठेवले पाहिजे.'



धर्मांतराच्या मुद्द्यावर भाष्य करताना स्वामी रामदेव म्हणाले, 'सनातन संस्कृती अत्यंत प्राचीन आहे. यात कुठलीही कमतरता नाही. भूतकाळात भीती, चमत्कार आणि लालूच दाखवून, गैरसमज पसरवून आपल्या सनातनी बांधवांचे मुस्लीम केले गेले. जेव्हा ख्रिश्चनांनी लोकांचे धर्मांतर करून त्यांना ख्रिश्चन बनवले, तेव्हाही आम्ही गप्प राहिलो.

सनातन धर्मातील सामाजिक भेदभावाच्या आरोपांसंदर्भात बोलताना ते म्हणाले, केवळ काही निवडक लोकच एका विकृत मानसिकतेचे बळी आहेत. सनातनी असणे म्हणजे प्रभू रामाची मर्यादा, प्रभू कृष्णाचे कर्म स्वीकारणे आणि प्रभू शिव शंकरांचे पावित्र्य आणि सत्याशी जोडलेले असणे. जर या मूल्यांचे पालन केले, तर धर्मांतराचा प्रश्नच उद्भवणार नाही.

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी पाकिस्तानच्या स्वातंत्र्यदिनी निर्लज्जपणे म्हणाले होते की, 'भारतीयांची विचार करण्याची पद्धत वेगळी आहे. त्यांच्या मनात एक वेगळा अजेंडा आहे. त्यांचा अखंड भारतावर विश्वास आहे. पण या दोन्हींच्या मध्ये बरेच काही आहे, जे ते विसरले आहेत. आम्ही मुस्लिम आहोत. ते नाहीत. पण आपण त्या मानसिकतेचे मुस्लीम आहेत, जे ३-४ टक्के हिंदू लोकसंख्येला सहन करतात.

दरम्यान, पाकिस्तानच्या जनगणना २०२३ च्या अहवालानुसार, तेथे केवळ २.१७टक्के (सुमारे ५२ लाख) एवढेच हिंदू उरले आहेत. झरदारी यांनी ३-४ टक्के हिंदू असल्याचा चुकीचा दावा केला आहे.

## गिरीश महाजन नाशिकचे, तर भरत गोगावले रायगडचे पालकमंत्री

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या रायगड आणि नाशिक पालकमंत्रिपदाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांची नावं आज शासनाकडून जाहिर करण्यात आली आहेत. नाशिकमध्ये गिरीश महाजन, तर रायगडमध्ये भरत गोगावले यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महायुतीमधील तीनही पक्षांचे स्थानिक नेते आपापल्या जिल्ह्यांत आपले वर्चस्व राहावे आणि निधीचे नियंत्रण मिळावे यासाठी आक्रमक होते. यामुळे नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्त्यांवर स्थगिती देण्यात आली होती. मात्र आज अखेर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा प्रश्न सुटला आहे. रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात रस्सीखेच सुरू होती. रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी मंत्री आदिती तटकरे आणि मंत्री भरत गोगावले दोघेही इच्छुक होते. मात्र अखेर ही जबाबदारी भरत गोगावले यांच्याकडे सोपवण्यात आली. तर नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात चुरस होती. परंतु अखेर नाशिकची धुरा गिरीश महाजन यांच्याकडे कायम ठेवण्यात आली आहे. दरम्यान, नुकतेच भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी नाशिकमध्ये गिरीश महाजन यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालय व शासकीय ठिकाणी मुख्य ध्वजारोहण करण्यात आले होते. तर रायगडमध्ये मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## मराठा महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य भोवले:ओबीसी नेते नवनाथ वाघमारेंवर अखेर गुन्हा दाखल, वाढत्या दबावानंतर मागितली माफी

जालना दि.१७ (प्रतिनिधी)- ओबीसी नेत्यांची गोंडस मुले आणि पैसा पाहून मराठा समाजाच्या मुली त्यांच्या घरात घुसतात, असे अत्यंत संतापजनक आणि आक्षेपार्ह विधान करणारे ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांच्यावर अखेर जालना पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या विधानावरून राज्यभरात मराठा समाजातील महिला कमालीच्या आक्रमक झाल्या होत्या. वाढता दबाव आणि ठिकठिकाणी होणाऱ्या निदर्शनांनंतर वाघमारे यांनी आपल्या वक्तव्याबाबत खेद व्यक्त करत माफी मागितली आहे.

एका यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत नवनाथ वाघमारे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून बोलताना थेट नेत्यांच्या घरातील महिलांना लक्ष्य केले होते. ते म्हणाले होते: ''स्वतः चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे की, माझी सून मराठा आणि बायको कुणबी आहे. त्यांच्या घरात सगळे सोयरे घुसले असतील. फक्त बावनकुळेच नाही, तर अनेक ओबीसी मंत्र्यांच्या घरात मराठ्यांच्या मुली घुसल्या आहेत. ओबीसी मंत्र्यांची गोंडस मुले आणि पैसा दिसला की मराठा मुली त्यांच्या घरात घुसून लग्न करतात. जर हे मंत्री मराठ्यांच्या मुलींचे ऐकून ओबीसींचे वाटोळे करत असतील, तर त्यांनी समोर येऊन सांगावे, असेही वाघमारे म्हणाले होते.

वाघमारेंच्या या विधानामुळे मराठा समाजाला टार्गेट करण्यासाठी थेट महिलांचा अपमान झाल्याची भावना निर्माण झाली आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली. जालना येथील कदीम पोलीस ठाण्यात मराठा समाज बांधवांनी वाघमारे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तक्रार दाखल केली. दोन समाजांत तेढ निर्माण करणे आणि महिलांच्या लज्जेस धक्का पोहोचेल असे वक्तव्य केल्याप्रकरणी वाघमारेंवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी दिली.

नांदेडमध्ये सकल मराठा समाजाच्या महिलांनी मोठा मोर्चा काढून वाघमारेंच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा दिला होता. तर सोलापूरच्या माढ्यातही त्यांच्याविरोधात जोरदार निदर्शने झाली.

## गांधी परिवारावर टीका करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे-नाना पटोले

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- गांधी परिवारावर होत असलेल्या टीकेवरून काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. गांधी परिवाराच्या देशासाठीच्या योगदानाकडे दुर्लक्ष करून टीका करणे योग्य नाही, असे म्हणत पटोले यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले. ''गांधी परिवारावर टीका करणे म्हणजे थेट सूर्यावर थुंकण्यासारखे आहे,'' असा सणसणीत टोला त्यांनी लगावला.

भाजपच्या नेत्यांनी दुसऱ्यांवर टीका करण्यापूर्वी आपल्या मुळाकडे, म्हणजेच आरएसएसकडे वळून पाहिले पाहिजे, असे नाना पटोले म्हणाले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आरएसएसचा कोणताही सहभाग नव्हता, याकडे लक्ष वेधत त्यांनी भाजपच्या देशभक्तीवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले.

देशाच्या राष्ट्रध्वजाबाबत संघाच्या भूमिकेवर बोट ठेवत पटोले यांनी गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, ''या लोकांनी सलग ५२ वर्षे देशाचा तिरंगा फडकवला नाही. उलट, याच तिरंग्याला त्यांनी अपशकुनी म्हटले होते.'' ज्यांनी देशाच्या झेंड्याचा आणि स्वातंत्र्यलढ्याचा सन्मान केला नाही, त्यांना काँग्रेसच्या किंवा गांधी परिवाराच्या देशभक्तीवर बोलण्याचा (पान ४ वर)

## पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या दोन तासांत होणार-गडकरी

पुणे दि.१७ (प्रतिनिधी)- पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याच्या रस्ते विकासाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. यावेळी बोलताना ते म्हणाले की, पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे माझे स्वप्न असून त्यासाठी शानदार महामार्ग विकसित केला जात आहे. या प्रस्तावित सहापदरी महामार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि तिथून पुढे थेट नागपूरपर्यंतचा प्रवास अत्यंत जलद आणि सुलभ होणार असून त्यासाठी विमानाचीही गरज भासणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासोबतच, मुंबई ते बंगळुरू हा प्रवास अवघ्या पाच तासांत पूर्ण होईल, असे दर्जेदार रस्तेही बनवण्यात येत असल्याचे गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केले.



याच कार्यक्रमात गडकरी यांनी पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाच्या गंभीर समस्येवरही भाष्य केले. या समस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे हाती घेतली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या भव्य विकासकामांमध्ये ३१ हजार ६०० कोटी रुपयांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा शिरूर ते पुणे प्रकल्पाचाही समावेश करण्यात आला असून, यामुळे पुणेकरांचा प्रवास (पान ४ वर)

## उज्जैनच्या महाकाल मंदिरात नागचंद्रेश्वर दर्शनासाठी जमलेल्या गर्दीत १३ भाविक बेशुद्ध

उज्जैन दि.१७ (वृत्तसंस्था)- मध्य प्रदेशातील उज्जैन येथील नागचंद्रेश्वर मंदिरात श्रावणच्या तिसऱ्या सोमवारी भाविकांची मोठी गर्दी झाल्याने किमान १३ जण बेशुद्ध पडले. नागपंचमीच्या दिवशी हे मंदिर वर्षातून केवळ एकदाच भाविकांसाठी खुले केले जाते. यंदा नागपंचमीसोबत श्रावणचा तिसरा सोमवार आल्याने मंदिर परिसरात मोठी गर्दी झाली होती.

मंदिर प्रशासनाच्या माहितीनुसार, भाविक हरसिद्धी मंदिरासमोरील बॅरिकेडिंग केलेल्या परिसरात दर्शनासाठी प्रतीक्षा करत होते. गर्दी वाढत असतानाच बॅरिकेडिंगच्या आतील बाजूला असलेल्या ट्रान्सफॉर्मरजवळ वीज गळती झाल्याची अफवा पसरली. त्यामुळे काही काळ घबराट निर्माण झाली. गर्दी आणि गोंधळाच्या परिस्थितीत १३ भाविकांची प्रकृती बिघडून ते बेशुद्ध पडले. त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, सर्व जखमींना निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. पोलीस आणि प्रशासनाच्या पथकांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली.

## अन्यथा २९ ऑगस्टनंतर सरकारची जिरवणार; मनोज जरांगेंचा इशारा

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई, खानदेश, विदर्भ आणि मराठवाडा अशा राज्यातील सर्व भागांमध्ये मराठ्यांवर आणि कुणबींवर अन्याय होत असल्यास एकजुटीने आणि आक्रमकपणे उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे होणाऱ्या आंदोलनाची तयारी करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ''पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई, खानदेश, विदर्भ, मराठवाडा जिथे जिथे मराठ्यांवर, कुणबीवर अन्याय होईल, त्यांनी एक जीवाने आणि आक्रमकपणे उठायचे आणि २९ ऑगस्टच्या अंतरवालीच्या आंदोलनाची तयारी करायची, ही विनंती आहे. कुणाच्या दबावाला बळी पडू नका. घाबरू नका. शांत बसू नका, आक्रमक व्हा,'' असे त्यांनी म्हटले.

यावेळी आपल्या आगामी दौऱ्याबाबत माहिती देताना जरांगे पाटील म्हणाले की, ''२० ते २५ ऑगस्टदरम्यान विदर्भ, मराठवाडा दौरा करणार आहे. २९ ऑगस्टला उपोषण करणार आहे. माझं समाजापुढे जे कर्तव्य होतं, ते मी पूर्ण केलं. राज्यातल्या सगळ्या अभ्यासकांना मी काल बोलावले होते. २९ ऑगस्टला उपोषण करायचे आहे. पुढचे जीआर कसे काढायचे, मागच्या जीआरमध्ये काय सुधारणा करायची का, काय-काय करायचं यावर मी माझे कर्तव्य पार पाडले,'' असे त्यांनी सांगितले.



मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, ''उद्या मला मराठा समाज म्हटला असता की, अभ्यासक काय विरोधात बोलतात, ते नेहमी म्हणतात आमचं ऐकून घेत नाही. आम्हाला दुरुस्त्या सांगायच्या होत्या, त्या ऐकून घेतल्या नाहीत. म्हणून मी त्यांना निवांत १६ तारखेला या असे सांगितले होते. महाराष्ट्र पुढे दिसले की, यांना गोरगरिबांशी एकनिष्ठ राहायचे नाही. या लोकांना फक्त मराठ्यांच्या विरोधात मराठ्यांचेच (पान ४ वर)

## एकनाथ शिंदे काँग्रेसमध्ये येणार होते; हुसेन दलवाईंचा दावा

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड व मुंबईतील पत्रकार परिषदेत भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये येणार असल्याचा मोठा दावा केला होता. या विधानाची चर्चा सुरू असतानाच, काँग्रेसचे आणखी एक ज्येष्ठ नेते हुसेन दलवाई यांनीही एकनाथ शिंदे हेदेखील काँग्रेसमध्ये प्रवेश करणार होते, मात्र काँग्रेसच्याच काही नेत्यांनी त्यांचा हा प्रवेश होऊ दिला नाही, असा खळबळजनक गौप्यस्फोट केला. दलवाई यांच्या या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले असून, आता या नव्या दाव्यावर खुद्द पृथ्वीराज चव्हाण यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हुसेन दलवाई यांनी एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यासंदर्भात विचारले असता, हा नवीन विषय असल्याचे सांगत माजी पृथ्वीराज चव्हाण यांनी आपली भूमिका मांडली. यावर अधिक भाष्य करताना ते म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि आमची चर्चा झाली होती. मात्र काय झाली ते सांगणार नाही. एकनाथ शिंदे आमचे मित्र आहेत ते आमचे काम करत नाहीत मात्र आजही आमचे मित्र आहेत ते आमच्या जिल्ह्यातले आहेत. आमच्या अनेक गाठीभेटी झाल्या होत्या मात्र त्यावर मी बोलणार नाही, असे स्पष्टीकरण चव्हाण यांनी दिले.

# शहरांचे पर्यावरणीय आरोग्य ढासळतेय...

बदलत्या हवामानाचा परिणाम शहरांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे शहरातील कथित सामान्य सुरक्षित जीवन सातत्याने बाधित होत आहे. आजघडीला कधी शहरे पाण्याने तुंबतात, तर कधी पाण्याच्या टंचाईचा सामना करतात. शहरांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर असतो. शहरांच्या पायाभूत सुविधांवर भर देताना त्यांचे पर्यावरणही जपले पाहिजे, तरच शहरातील नागरिकांचे जीवन सुसह्य होईल.

पावसाळा काही प्रमाणात अशांतता आणतो; परंतु अस्थिरता ही एक नवी सामान्य बाब बनत आहे, जी बदलत्या हवामानाचे लक्षण आहे. आपली शहरे वाढता वीज वापर, पाण्याची मागणी आणि बिघडत्या सार्वजनिक पायाभूत सुविधांशी झुंजत आहे. ऊर्जा आणि पाणी प्रणालींवर दबाव आणत आहे. कमी होत जाणारी हिरवळ, गायब होणारे तलाव, तुंबलेले नैसर्गिक नाले आणि खराब कचरा व्यवस्थापन या सर्वांमुळे मुसळधार पावसात शहरात पूर येतो आणि उष्णतेच्या लाटेत पाण्याची टंचाई निर्माण होते. या पार्श्वभूमिवर काही शहरांमध्ये झालेले काम इतरांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे. निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांमध्ये नैसर्गिक किंवा मानवनिर्मित हिरवीगार जागा आणि पाणवठ्यांचा समावेश आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. 'तलावांचे शहर' उदयपूर हे हिरव्या आणि पाण्याच्या एकात्मिक पायाभूत सुविधा काय करू शकते याचे एक उत्तम उदाहरण आहे. पावसाळ्यात, रामसर वेटलँड सिटी म्हणून ओळखले जाणारे उदयपूरचे तलाव वनस्पती आणि जलजन्य प्राण्यांनी भरलेले असतात. पृष्ठभागावरील प्रवाह कमी करतात. भूजल पुनर्भरण करतात. पर्यावरण थंड करतात आणि जवळच्या मोठ्या तलावांमधून येणारे पाणी शोषून घेतात. पहिले म्हणजे शहराच्या मास्टर प्लॅनमध्ये हिरव्या आणि निळ्या जागांचा समावेश केला पाहिजे. त्याचा विकास सामान्यतः २० वर्षांसाठी केला जातो. बेकायदेशीर भू-वापर बदलाविरुद्ध स्पष्ट कायदेशीर तरतुदी असायला हव्यात. त्याचप्रमाणे २०२७ पर्यंत एक हजार शहरी जंगले विकसित करण्याचे उद्दिष्ट असलेल्या नगर वन योजनेची अंमलबजावणी वेगात केली पाहिजे. दुसरे म्हणजे शहरांनी घरगुती सांडपाण्याचा पुनर्वापर व्यवस्थापित करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी विशेष योजना तयार केल्या पाहिजेत. अशा योजना स्थानिक जलाशय, तलाव तसेच जमिनीसारख्या शहरी जलस्रोतांचे सांडपाणी प्रदूषणापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे परिसंस्था त्यांच्या आवश्यक सेवा प्रभावीपणे प्रदान करू शकतात.

ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने केलेल्या एका अभ्यासात असे सुचवण्यात आले आहे, की एका मजबूत योजनेत पाण्याचे संतुलन आणि गुणवत्ता मूल्यांकन, पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याच्या उद्देशांसाठी पुनर्वापराचे पर्याय ओळखणे, पुनर्वापरासाठी व्यावहारिक लक्ष्ये निश्चित करणे, प्रक्रिया केलेल्या वापरलेल्या पाण्यासाठी वाटप यंत्रणा परिभाषित करणे आणि अंमलबजावणीसाठी संस्थात्मक रचना तयार करणे यांचा समावेश असावा. शहरांनी निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी स्थिर वित्तपुरवठा आणि नागरिकांचा सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. इंदूर आणि अहमदाबादमध्ये महानगरपालिका रोखे आणि राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधण्यासाठी वापरले जाणारे हायब्रिड वार्षिकी मॉडेल काय शक्य आहे ते दर्शवतात. सामान्यतः वनीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रीय भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण निधीचा वापर विद्यमान शहरी जंगले आणि हरित कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी केला पाहिजे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित पायाभूत सुविधांचे संचालन आणि देखभाल यांसारख्या क्रियाकलापांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. पाणीपुरवठा, कचरा संकलन, विल्हेवाट, उद्याने आणि इतर हिरव्या जागांची देखभाल यांसारख्या सेवांचा खर्च भागवण्यासाठी वापरकर्ता शुल्क आकारले पाहिजे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी अनुदाने सुरूच ठेवली पाहिजेत; परंतु शहरांनी नागरी जबाबदारीची मागणी करण्यास मागेपुढे पाहू नये. विकसित देशांमधील कोणतेही शहर सार्वजनिक सहभाग न घेता लवचिक पायाभूत सुविधा उभारू शकलेले नाही. भारतीय शहरे विकास, रोजगार आणि समृद्धीचे चालक आहेत; परंतु त्यांना हवामान धोक्यांचाही सामना करावा लागत आहे. आपण शहरांचे पर्यावरणीय पायामध्ये गुंतवणूक करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचे भविष्य धोक्यात आणू. गेल्या काही दशकांमध्ये भारताने जलद शहरीकरण पाहिले आहे. भारतातील शहरांची वाढ मोठ्या प्रमाणात अनियोजित आहे. त्यामुळे अनेक आव्हाने आणि शहरी अराजकता निर्माण झाली आहे. अनियोजित शहरी वाढीचा सर्वात विनाशकारी परिणाम म्हणजे विद्यमान पायाभूत सुविधांवर दबाव. पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांना वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी, पायाभूत सुविधांवर जास्त ताण येतो. यामुळे गर्दी, अपुरी सेवा आणि जीवनमान कमी होते. अनियोजित शहरी विकासामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणात मोठी वाढ झाली.

ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, विविध शहरी भागात झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राहणीमान आणि सामाजिक असमानता कमी होत आहे. भारतातील अनियोजित शहरी विकासामुळे पर्यावरणाचे नुकसान झाले आहे. लोक अनेकदा वनजमिनीवर अतिक्रमण करतात. त्यामुळे जैवविविधतेचे नुकसान होते. अनियंत्रित बांधकाम, अयोग्य कचरा व्यवस्थापन आणि अनियंत्रित औद्योगिकीकरण प्रदूषण मातीची धूप आणि पाण्याची कमतरता निर्माण करते. शहरांची अनियोजित वाढ सामाजिक असमानता वाढवते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी शाश्वत शहरी नियोजन, पायाभूत सुविधा विकास आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांना एकत्रित करणारा बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. महानगरांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. कधी कधी मुसळधार पाऊस प्राणघातक ठरू शकतो. पावसाळ्यात मुंबई, चेन्नई आणि बंगळूरुसारख्या शहरांमधील रस्ते पाण्याखाली जातात आणि सामान्य लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. भारतीय शहरांमध्ये दर पावसाळ्यात पूर येणे सामान्य आहे. जलद शहरीकरणामुळे, शहरातील तलाव गायब होत असून नाले कचऱ्याने भरली आहेत. अलीकडच्या वर्षांमध्ये अशा पुरांपूर्वी दिल्ली आणि बंगळूरुमध्ये पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. तिथे पाणी साठवण्याच्या जागा कमी झाल्या आहेत. या वर्षी पावसाळ्यापूर्वी बंगळूरुमध्ये असे पाणी संकट निर्माण झाले, की लोकांना आवश्यक कामांसाठी खासगी टँकरमधून जास्त किमतीत पाणी खरेदी करावे लागले. जून महिन्यात देशाची राजधानी दिल्लीमध्येही अशीच परिस्थिती दिसून आली. जूनमध्ये कडक उन्हामुळे पाण्याचे संकट इतके बिकट झाले, की लोकांना पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागले. बंगळूरुप्रमाणेच दिल्लीतील लोकांनाही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागले. या परिस्थितीचा विचार करून शहरांच्या पर्यावरणीय संतुलनाचे नियोजन केले, तर काहीसा दिलासा मिळू शकतो.

# देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा; सर्वसामान्य माणूस हाच विकासाचा केंद्रबिंदू- पालकमंत्री संजय शिरसाट



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – विविधतेने नटलेला आपला देश एकसंघ ठेवण्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. जिल्ह्याचा विकास करत असतांना सर्वसामान्य माणूस हाच केंद्रबिंदू आहे. आपण समाजातील सर्व घटक मिळून विकास प्रक्रियेत सहभागी होऊ,असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज केले.

देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन आज मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात पार पडला. प्रारंभी वंदेमातरम गायन झाले. त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर राष्ट्रगीत होऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. त्यानंतर राज्यगीत झाले.

आपल्या संबोधनात पालकमंत्री शिरसाट यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण केले. हुतात्म्यांना अभिवादन करुन आदरांजली वाहिली.

सोहळ्यास विधानपरिषदेचे सदस्य आ. अंबादास दानवे, माजी खा. चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जी.श्रीकांत,जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम.,छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव तसेच सर्व वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते. त्यानंतर ते म्हणाले की,देशाचा स्वातंत्र्य दिन साजरा होत असतांना या आनंदात प्रत्येक देशवासी सहभागी झाला आहे. आपापसातले सर्व भेद विसरुन सर्व जाती धर्माचे लोक एकत्रितपणे स्वातंत्र्याचा आनंद घेत आहेत, हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. विविधतेने नटलेला हा देश एकसंघ ठेवण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. आपल्या सगळ्यांसाठी आपली राज्यघटना सर्वोपरी आहे. आपल्या आधीच्या पिढ्यांनी केलेल्या त्याग आणि बलिदानामुळेच हे स्वातंत्र्य आपण उपभोगत आहोत,याचे स्मरण प्रत्येकाने ठेवावे असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आपले राज्य प्रगती करत असतांना शासनाचा केंद्रबिंदू हा सर्वसामान्य माणूस आहे. विकास करतांना तो सर्व घटकांचा झाला पाहिजे, हेच शासनाचे धोरण आहे. आपण सर्व मिळून त्यात सहभागी होऊ. एकत्रितपणे देशाचा विकास करु,असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्यात शासनामार्फत विविध योजनांद्वारे लोकांना देण्यात येत असलेला लाभ, घाटी रुग्णालयाला सुपर स्पेशालिटी रुग्णालय बनविण्याचा संकल्प, खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, अत्याधुनिक अग्निशामक दल अशा अनेक सुविधा उपलब्ध करुन देत असल्याबाबत त्यांनी उपस्थितांना सांगितले.

**जलसंधारणाची शपथ–** त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांनी सगळ्यांना जलसंधारण सप्ताहाची शपथ दिली. तसेच यानिमित्ताने राबविण्यात येणाऱ्या सप्ताहाच्या लोगोचे अनावरणही पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विविध पुरस्कार वितरण व लोकार्पण सोहळ्याला पालकमंत्र्यांनी उपस्थिती लावली. उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आदिंना भेटून त्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**स्वच्छता वाहनांचे लोकार्पण –** याप्रसंगी पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते सात जेटींग स्वच्छता वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. ही वाहने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, कन्नड, पैठण, सोयगाव, वैजापूर, फुलंब्री, गंगापुर या नगरपालिकांना वितरीत करण्यात आली.

**कक्ष नुतनीकरण उद्घाटन –** त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांनी विभागीय आयुक्त कार्यालयातील दालन व कक्ष नुतनीकरणाचे उद्घाटन करुन पाहणी केली व मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकाच्या बांधकामाबाबत आढावाही घेतला.

याप्रसंगी वितरीत करण्यात आलेले पुरस्कार –

पोलीस उत्कृष्ट सेवा पदक– छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे, पोलीस उपायुक्त शशिकांत सातव.

अति उत्कृष्ट सेवा पदक– सुभाष भुजंग,उपविभागीय पोलीस अधिकारी सिल्लोड विश्वजीत काईगडे, अविनाश आघाव, अमोल देशमुख, अविनाश बागुल, रफिक पठाण,किरण गावंडे, इम्तियाज अहमद,विठ्ठल राख,प्रदीप धनवे, बाळू थोरात,आत्माराम पैठणकर, देविसिंग ठाकूर, शिरीष वाघ, विनोद आघाव.

# जलसंधारण सप्ताहानिमित्त विविध जनजागृती उपक्रम; २१ ऑगस्टला 'महा वॉकेथॉन' स्पर्धा; सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी)- शाश्वत विकासासाठी मृद व जलसंधारणाचे महत्त्व जनमानसात रुजवून जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी दि. १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' राबविण्यात येणार आहे. सप्ताहानिमित्त विविध जनजागृती उपक्रमांसह दि. २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात येणार आहे. तसेच युवकांच्या सर्जनशील सहभागातून जनजागृतीसाठी "Reel for Soil and Water Conservation' या राज्यव्यापी रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांत सहभागी व्हावे असे आवाहन जलसंधारण विभागामार्फत करण्यात आले आहे.

"Save Soil, Save Water, Secure Tomorrow' ही अभियानाची संकल्पना असून 'पाणी अडवा, पाणी जिरवा; जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

**२१ ऑगस्टला 'महा वॉकेथॉन' –** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दि. २१ ऑगस्ट रोजी कमाल तीन किलोमीटर अंतराची 'महा वॉकेथॉन' आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी मृद व जलसंधारणाची शपथ घेण्यात येईल. वयाची १५ वर्षे पूर्ण केलेले व त्यावरील सर्व महिला व पुरुष यामध्ये सहभागी होऊ शकतात. सहभागींसाठी क्यूआर कोड आधारित ऑनलाइन नोंदणीची व्यवस्था करण्यात आली असून प्रत्येक सहभागी व्यक्तीस ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

महा वॉकेथॉनसाठी जिल्ह्यातील राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद व विधानसभा सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष, महापौर व उपमहापौर, नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्य, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत सदस्य तसेच अन्य स्थानिक लोकप्रतिनिधींना विशेष निमंत्रित करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक यांच्यासह सर्व शासकीय व निम शासकीय अधिकारी-कर्मचारी या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती, डॉक्टर, कलाकार, उद्योजक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरू युवा केंद्र, भारत स्काऊट अँड गाईड, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब, लायन्स क्लब, रनिंग व सायकलिंग क्लब, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदारी कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप, व्यायामशाळा, महिला व नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**महा वॉकेथॉनचे वेळापत्रक**

दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत सहभागींचे कार्यक्रमस्थळी आगमन होईल. सकाळी ६.१५ वाजता वॉर्म अप, ६.४५ वाजता मृद व जलसंधारणाची शपथ घेण्यात येईल. सकाळी ७ वाजता मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून महा वॉकेथॉनला प्रारंभ होईल. सकाळी ८ वाजता वॉकेथॉन समाप्त होईल. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता संदेश, पुरस्कार वितरण व आभार प्रदर्शन होईल.

Reel for Soil and Water Conservation' **राज्यव्यापी स्पर्धा –** जलसंधारण सप्ताहादरम्यान १५ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करून Instagram च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी राज्यव्यापी "Reel for Soil and Water Conservation' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित केली जाणार आहे. स्पर्धेसाठी १५ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवती पात्र असतील. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करावी. व्हिडिओ किंवा रीलच्या सुरुवातीला व्हिडिओ/रीलचा उद्देश, स्वतःचे नाव आणि जिल्ह्याचे नाव नमूद करावे. रील स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करणे आवश्यक असून मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram Account bm Tag करणे बंधनकारक राहील. तसेच अधिकृत #SaveSoilSaveWater हॅशटॅग वापरणे अनिवार्य राहील.

स्पर्धेची माहिती व जनसंपर्क संचालनालयाने मान्यता दिलेल्या संस्थेमार्फत अधिकृत QR Code उपलब्ध करून दिला जाणार आहे. QR Code स्कॅन केल्यानंतर नोंदणी, Reel Link Submit, जिल्हा निवड, Verification व सहभाग प्रमाणपत्र अशी प्रक्रिया असेल. Instagram हँडलवर स्वतंत्र डिजिटल नोंदणीमुळे प्रत्येक सहभागीची अधिकृत नोंद शासनाकडे उपलब्ध राहणार आहे. रील्स आणि वॉकेथॉनच्या नोंदणीसाठी QR Code वापरता येणार आहे.

रील अपलोड करण्याचा कालावधी जलसंधारण सप्ताहादरम्यान राहणार आहे.

**रीलसाठी विविध विषय –** माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नावीन्यपूर्ण कल्पना तसेच 'आजचे संवर्धन - उद्याचे सुरक्षित भविष्य' या विषयांवर रील तयार करता येणार आहे.

स्पर्धकांना Storytelling, Acting, Music, Dance, Animation, AI Creative, Comedy, Short F$ilm, Before-After, Drone Visuals किंवा अन्य नावीन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येईल. मात्र रीलचा मुख्य संदेश माती आणि पाणी संवर्धनाशी संबंधित असणे आवश्यक आहे.

**रील स्पर्धेसाठी एकूण १०० गुण –** स्पर्धेचे मूल्यमापन १०० गुणांमध्ये करण्यात येणार आहे. त्यात विषय व संदेशासाठी ३० गुण, कल्पकतेसाठी २५ गुण, प्रभावी सामाजिक संदेशासाठी २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्तेसाठी १५ गुण आणि Instagram Engagement साठी १० गुण असतील. केवळ Likes किंवा Followers वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement या दोन्हींच्या आधारे निकाल देण्यात येईल. अंतिम विजेत्यांची निवड जिल्हाधिकारी करतील.

**विजेत्यांना रोख पारितोषिके–** जिल्हास्तरावर महाराष्ट्र युवा जलदूत या नावाने सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रकासह तीन पारितोषिके दिली जाणार आहेत. प्रथम क्रमांकास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये पारितोषिक दिले जाईल. उत्कृष्ट सहभागींनाही ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

युवकांपर्यंत स्पर्धेची माहिती पोहोचविण्यासाठी जिल्ह्यातील विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, एनएसएस, एनसीसी, नेहरू युवा केंद्र, क्रीडा व युवक संस्था, स्वयंसेवी संस्था, पर्यावरण संस्था, Instagram Creators, YouTubers आणि Social Media Influencers यांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'एक Reel... मातीसाठी!, एक Reel... पाण्यासाठी!, एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी!' हा रील प्रचाराचा मुख्य संदेश असणार आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून युवकांच्या माध्यमातून मृद व जलसंधारणाची डिजिटल लोकचळवळ निर्माण करणे हा आहे.

**शाळा-महाविद्यालयांतही जलजागृती**

जलसंधारण अभियानांतर्गत दि. १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी या कालावधीत राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांतील शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना दि. २६ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

याअंतर्गत जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे महत्त्व, 'जल है तो कल है', जलसंवर्धनाचे उपाय आणि घरातील पाण्याचा वापर अर्थात "Water Budget' या विषयांवर निबंध स्पर्धा घेतली जाईल. जलसंवर्धन उपाय, पाणी बचत आणि R>ainwater H$arvesting विषयांवर चित्रकला व पोस्टर स्पर्धा तसेच 'जलसंधारण शासकीय जबाबदारी की जनतेची जबाबदारी' या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

'एक शाळा - एक शोषखड्डा' उपक्रम राबविणे, सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्त्व सांगणे, जलगीत व जलदूत संकल्पित करणे, २२ ऑगस्ट रोजी शाळेत मृद व जलसंधारण नाईक यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणे, २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, तसेच प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पुरस्कार वितरण करणे आदी उपक्रम राबविले जाणार आहेत. दि. २१ ऑगस्ट रोजी गावातील किंवा शहरातील जलतज्ज्ञ अथवा प्रतिष्ठित व्यक्तीस प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्याचेही नियोजन आहे.

**क्षेत्रीय स्तरावर विविध उपक्रम**

पाणी हे ग्रामीण भागासोबतच शहरी नागरिकांसाठीही मूलभूत गरज असल्याने दि. १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी या कालावधीत क्षेत्रीय स्तरावर विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. ग्रामीण व शहरी भागातील मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन, लोकार्पण व जलपूजन, केंद्र शासनाच्या केंद्र ते रेन पोर्टलवरील कामांना स्थळी भेटी, अमृत सरोवरांना भेटी व सरोवरांच्या आसपास वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र'साठी ग्रामीण व शहरी भागात वृक्षारोपण करणे, 'एक पेड़ माँ के नाम' अभियान राबविणे, लोकसहभागातून नाले, तलाव, विहिरी व पाझर तलावांची स्वच्छता करणे तसेच शेततळे, शोषखड्डे व CCT/Deep CCT कामांची पाहणी करून छायाचित्रे घेणे आदी उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

जलसंधारण सप्ताहाच्या कालावधीत आणि दि. २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेण्यात येणार आहे. माती व पाणी या नैसर्गिक संपत्तीचे जतन, पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन, पाणी अडविणे व जिरविणे, पाणलोट विकास, पावसाचे पाणी संकलन आणि भूजल पुनर्भरणासाठी लोकसहभाग वाढविण्याचा संकल्प यानिमित्त करण्यात येणार आहे.

मृद व जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, युवक, महिला, विविध संस्था-संघटना आणि नागरिकांनी 'महा वॉकेथॉन', रील स्पर्धा तसेच जलसंधारण सप्ताहातील विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७'चा संकल्प करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करूया - महापौर समीर राजूरकर

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) - भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालयात महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना महापौरांनी 'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७' हे शहराच्या विकासाचे ध्येय ठेवून सर्व घटकांच्या सहकार्याने शहराला देशातील प्रगत आणि आदर्श शहर बनविण्याचा निर्धार व्यक्त केला.

स्वातंत्र्यासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांना तसेच स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करून महापौर राजूरकर म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरला मोठा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. मलिक अंबर यांनी शहराच्या नियोजनातून निर्माण केलेल्या ऐतिहासिक वास्तू, जलव्यवस्थापन आणि नगररचनेचा वारसा आजही शहराच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. या समृद्ध वारशाचे जतन करत आधुनिक आणि विकसित शहराची निर्मिती करण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आहे.

**'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७'चा रोडमॅप तयार करण्यावर भर –** आगामी वीस वर्षांचा विचार करून शहराच्या विकासाचे नियोजन करण्याची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत २०४७'चे उद्दिष्ट निश्चित केले असून महाराष्ट्र सरकारनेही 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे लक्ष्य निश्चित केले आहे. त्याच धर्तीवर 'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७' चा आराखडा तयार करून शहराच्या सर्वांगीण विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.



वाढते औद्योगिकीकरण लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालिकेची जबाबदारी वाढली आहे. शहराच्या भविष्यातील विस्ताराचा विचार करून दीर्घकालीन धोरण आखणे आवश्यक असल्याचे महापौरांनी नमूद केले.

**पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि मूलभूत सुविधांना प्राधान्य –** शहरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करताना पाणीपुरवठा आणि जल-मल निस्सारण व्यवस्थेला प्राधान्य देण्यात येणार आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्णत्वाकडे जात असताना अंतर्गत वाहिन्यांचे जाळे सक्षम करण्याची आवश्यकता आहे. तसेच शहरातील सर्व जल-मल निस्सारण वाहिन्यांचे कंटूर मॅपिंग लवकरात लवकर पूर्ण करून जुन्या आणि नव्या शहरातील ड्रेनेज व्यवस्थेचे नियोजन अधिक प्रभावीपणे करण्यावर भर दिला जाणार आहे. भविष्यातील देखभाल-दुरुस्ती सुलभ होण्यासाठी आवश्यक नकाशे व माहिती उपलब्ध असणे गरजेचे असून, ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आवाहन महापौरांनी केले.

**पर्यटन विकासातून शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना –** छत्रपती संभाजीनगरला पर्यटन राजधानी म्हणून मिळालेली ओळख अधिक बळकट करण्यासाठी पर्यटन विकासाला विशेष प्राधान्य देण्याची गरज महापौरांनी व्यक्त केली. शहरातील पर्यटनस्थळांचा एकात्मिक विकास, टुरिझम सर्किटची निर्मिती तसेच सफारी पार्क, सिटी सेंट्रल गार्डन आणि शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे स्मृती स्मारक यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून शहराच्या पर्यटन क्षमतेला चालना देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

पर्यटनाला चालना मिळाल्यास शहरातील रोजगाराच्या संधी वाढण्याबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**समतोल विकासातून 'नवे शहर, जुने शहर' ही दरी दूर करण्याचा निर्धार –** रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसोबतच नागरिकांच्या सांस्कृतिक गरजांचाही विचार करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांचा प्राधान्याने विकास करताना शहरातील कोणत्याही भागात भेदभाव न करता समतोल विकास साधण्याची गरज आहे.

'नवे शहर आणि जुने शहर' असा भेद न करता संपूर्ण छत्रपती संभाजीनगरचा एकसमान आणि सर्वसमावेशक विकास करण्याचा महानगरपालिकेचा दृष्टिकोन असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

**प्रशासनात शिस्त आणि कार्यक्षमतेवर भर–** महानगरपालिकेच्या कामकाजात शिस्त, वेळेचे नियोजन आणि कामांची प्रभावी अंमलबजावणी यांना महत्त्व देण्याची गरज महापौरांनी व्यक्त केली. महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी सक्षम असून त्यांच्या क्षमतेचा योग्य वापर करून प्रशासन अधिक कार्यक्षम आणि शिस्तबद्ध करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्याचा अर्थ केवळ स्वातंत्र्य उपभोगणे नसून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. महानगरपालिकेने नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी अधिक गतिमान आणि उत्तरदायी पद्धतीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

महापौर समीर राजूरकर यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना 'विकसित छत्रपती संभाजीनगर २०४७' हे आपले सामूहिक ध्येय असल्याचे सांगितले. सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी आणि शहरातील विविध घटकांनी एकजुटीने काम करून छत्रपती संभाजीनगरला देशातील प्रगत, सुंदर, सक्षम आणि आदर्श शहर बनविण्याचा निर्धार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, गलिच्छ वस्ती सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, गटनेते किशोर नागरे, हाजी शेरखान, सदस्य रशीद मामू, सचिन खैरे, सदस्या कीर्ती शिंदे, वॉर्ड सभापती अनिता मानकापे तसेच महानगरपालिकेचे सर्व सदस्य-सदस्या आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांची उपस्थिती होती.

# वैजापूर शहर व तालुक्यात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न



वैजापूर ता.१७ (प्रतिनिधी) – भारतीय स्वातंत्र्य दिन विविध शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व शाळा, महाविद्यालयात उत्साहात शनिवार (१५) रोजी संपन्न झाला. 'हर घर तिरंगा-घर, घर तिरंगा' या अंतर्गत नागरिकांनी आपल्या घरावर, प्रतिष्ठाण, दुकाने येथेही ध्वज फडकविला.

मुख्य शासकीय ध्वजारोहण नऊ वाजून पांच मिनीटांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय प्रांगणात उपजिल्हाधिकारी तथाउपविभागीय दंडाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.नगरपालिकेत नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, पंचायत समिती कार्यालयात सभापती कल्पना शिंदे, तहसील कार्यालयात तहसीलदार सुनिल सावंत, हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मार स्वातंत्र्य सैनिक वीर पत्नी लक्ष्मीबाई जयराम भोसले, पोलीस स्टेशन मध्ये नव्याने हजर झालेले पो.नि श्री सोनवणे तसेच विविध संस्था, कार्यालये, शाळा, महाविद्यालयात विभाग प्रमुखांनी झेंडा वंदन केले.

शहरात विविध कार्यालयावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती.तसेच पालिकेच्या वतीने शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसुचलन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीराम सिंह यांनी करून आभार मानले.

या प्रसंगी मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत, बिलाल शेठ, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, माजी नगराध्यक्षा शिल्पा ताई परदेशी, दशरथ बनकर, उल्हास ठोंबरे, विशाल संचेती, बाबासाहेब पुतळे, स्वप्नील जेजुरकर, राजेश गायकवाड, सुलतान खान, आमिरअली, ज्योती जोशी, सौ. कविता शिंदे, प्रीती बाठीया, पूजा त्रिभुवन, राजश्री राजपूत, संगीता राजपूत, दीपा राजपूत, पूजा त्रिभुवन, अनिता तांबे, सुनीता महाले, मायाबाई त्रिभुवन, कमलबाई लोंढे तसेच राजुसिंह राजपूत, डॉ. निलेश भाटीया, रमेश हाडोळे, नायब तहसीलदार रामेश्वर महाजन, श्री कुमावत, अशोक पवार, श्री. पगार, रवींद्र साखरे, श्री बच्चे, प्रेम राजपूत, शैलेश पोंदे, सन्मित खनिजो, शहरातील नागरिक उपस्थित होते.

# अलौकिक व्यक्तीमत्वाचे धनी : वामन दादा कर्डक यांना गीत गायन,शाहिरी, कला सादरीकनातून मनस्वी अभिवादन



वैजापूर /चितळी स्टेशन, दि. १७ (प्रतिनिधी) – आंबेडकरी महाकवी वामन दादा कर्डक यांच्या जयंती निमीत्ताने व एस. एस.कदम यांच्या स्मृतीं प्रित्यर्थ स्वातंत्र्य दिनी शनिवार(ता.१५)रोजी चितळी येथे काव्यसंमेलन, गीतगायन व कला सादरीकरण आणि कलावंताचा गौरव करीत मनस्वी अभिवादन करण्यात आले. शासनाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार मिळालेले साहित्यिक, समाजसेवक व कवी धोंडीरामसिंह राजपूत तसेच हाच पुरस्कार प्राप्त शाहीर अशोक बागुल(वैजापूर) यांनी आपल्या रचना सादर करून महाकवी वामन दादा कर्डक यांना अभिवादन केले.

तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रमुख महावीरसिंग चव्हाण,सेवा निवृत्त पोलीस उपनिरीक्षक कवी पत्रकार अहिल्या नगरचे सुभाष सोनवणे,गझलकार रज्जक शेख, कवी व प्रबोधनकार आनंदा साळवे,आयोजक शाहीर भीमराव कदम यांनी आपल्या संगीतमय रचना सादर करून आंबेडकरी महाकवी वामन दादा कर्डक यांच्या स्मृती जागृत करून अभिवादन केले. विद्रोही सांस्कृतिक चळवळ श्रीराम पूर व शाहीर भीमराव कदम परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते सुभाष सोनवणे, तर उदघाटक होते महावीरसिंग चव्हाण. प्रमुख अतिथी जालिंदर दिघे, राणीताई सोनवणे, शांताराम रणशूर, अशोक दिवे, डॉ.सलीम शेख, नारायण कदम, विश्वनाथ वाघ, रज्जाक शेख,पत्रकार किरणसिंह राजपूत वैजापूर यांची प्रमुख उपस्थिती होती. आयोजक शाहीर भीमराव कदम, छाया भीमराव कदम, विपुल कदम, पूजा कदम, कैलास कदम, राहुल कदम, सुरेखा कदम, सुनीता कदम, ॲड. अमोल सोनवणे, संतोष त्रिभुवन, विजय जगताप,योगेश बनसोडे, भीमराव गायकवाड, बंडू खरात, दीपक वाघ, किरण वैराळ, कविताताई पगारे यांनी विशेष सहकार्य करून वामन दादा कर्डक यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) संगीता सानप, उपजिल्हाधिकारी (रोहोयो) रुपेश शिंगारे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, अपर तहसिलदार उमेश पाटील, तहसिलदार पल्लवी लिगदे, रुपा चित्रक यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी –कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना भेटून शुभेच्छा दिल्या.

# स्वातंत्र्य दिनी ३५आदिवासी मुला-मुलींना जन्म प्रमाण पत्र प्रदान



वैजापूर, दि. १७ (प्रतिनिधी) – शहराच्या विविध शाळा मध्ये शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना जन्म प्रमाण पत्र नसल्याने त्यांना शासनाचे जातीचे प्रमाणपत्र व ईतर शैक्षणिक सवलती मिळत नव्हत्या ही बाब लक्षात घेऊन पालिका मुख्याधिकारी भागवत बिघोत व उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी डॉ.अरूण जऱ्हाड यांनी चर्चा करून विशेष बाब म्हणून या सर्व ३५,मुलां-मुलींना त्यांच्या कागद पत्राची नोंद घेऊन त्यांना जन्म प्रमाणपत्र पालिकेच्या वतीने देण्यात आले. त्याचे वाटप शनिवार स्वातंत्र्य दिनी (ता.१५) रोजी हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मारक येथे ध्वज वंदन झाल्या नंतर पालिका नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रीयाज अखिल शेख, मुख्याधिकारी भागवत बिघोत,माजी शिक्षणाधिकारी धोंडीराम सिंह राजपूत, मेजर गौतम अशोक गायकवाड, मेजर श्री देवकर, अशोक पवार तसेच नगरसेवक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यामुळे या विद्यार्थ्यांना आता या प्रमाण पत्र मुळे, जातीचे प्रमाण पत्र व शासनाच्या शैक्षणिक सवलतीचा मार्ग मोकळा झाला.या प्रसंगी मुलां-मुलींचेआई वडील आवर्जून उपस्थित होते. या प्रसंगी पालिका शिक्षक गोमलाडू,किशोर साळुंकर व नगरसेवक व शहरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# महावितरणच्या ग्राहकाभिमुख योजनांचा स्वातंत्र्यदिनी जागर



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर परिमंडलात महावितरणतर्फे विविध जनहिताच्या व लोककल्याणकारी योजनांचा जागर करण्यात आला. ग्राम ीण भागात महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी थेट नागरिकांसोबत संवाद साधत आधुनिक व पारदर्शक योजनांची माहिती दिली. जिल्ह्यातील विविध शाळा, ग्रामपंचायतींमध्ये आयोजित या मोहिमेत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि स्मार्ट मीटर योजनेवर विशेष भर देण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील साजापूर, करोडी, पळशी येथे स्वयंत्र्यदिनानिमित्त आयोजित ग्राम सभेत महावितरण अभियंते व कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. गंगापूर तालुक्यातील जामगाव, सिल्लोड तालुक्यातील आमठाणा, सिसारखेडा, गोळेगाव, घाणेगाव, सोयगाव तालुक्यातील सावळदबारा, कन्नड तालुक्यातील पिशोर, चिंचोली लिंबाजी तसेच जालना जिल्ह्यातील मसला (ता.परतूर) या गावांतही शाळा, ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना व स्मार्ट मीटर योजनेबाबत गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

या अभियानात महावितरणचे अभियंते, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. नागरिकांनी महावितरणच्या या आधुनिक व पारदर्शक योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# महावितरणमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – महावितरणच्या प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यकारी संचालक भुजंग खंदारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यकारी संचालक खंदारे यांनी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. कर्मचाऱ्यांनी महावितरणला प्रगतिपथावर घेऊन जाण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्य अभियंता कुमठेकर यांनी परिमंडलात सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा व महसुलवाढीचा संकल्प करण्याचे आवाहन कर्मचाऱ्यांना केले.

यावेळी शहर मंडल भरारी पथकाच्या स्थलांतरित कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, महेश पवार, बिना सावंत, शुभांगी कटकधोंड, उपमहाव्यवस्थापक कांचन राजवाडे, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, शंकर कुलकर्णी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, गिरीश गायकवाड, प्रसाद महातोले, प्रवीण जोशी, अविनाश चांदेकर, विलास खंडाळे, प्रणाली विश्लेषक राजाराम पाटील, मनीषा निफाडकर, सहायक संचालक अनिल वळवी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैजापूर संविधान युवा मंचच्या वतीने होतकरू गरीब विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनी शैक्षणिक साहित्य वाटप



वैजापूर, दि. १७ (प्रतिनिधी) – भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत येथील संविधान युवा मंचच्या वतीने स्वातंत्र्य दिनी शनिवार(ता.१५)रोजी पालिकेच्या सावित्रीबाई फुले विद्यालयात गोर,गरीब, मागासवर्गीय व होतकरू विद्यार्थीनीना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येऊन सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. पालिका मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा समाजसेवक ठा.धोंडीरामसिंह राजपूत व शालेय समिती अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.या प्रसंगी सेवा निवृत्त पर्यवेक्षक एम. आर. गणवीर,तसेच मुख्या ध्यापक आर. डी. शेलार यांची उपस्थिती होती.संविधान युवा मंचचे अध्यक्ष जीवन पठारे,उपाध्यक्ष श्रीकांत जाधव,सचिव व पत्रकार विलास म्हस्के यांनी विशेष प्रयत्न केले.

# विभागीय माहिती कार्यालयात उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी ) – माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विभागीय माहिती कार्यालयाच्या प्रांगणात उपसंचालक (माहिती) प्रवीण टाके यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्री टाके यांनी सर्व उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ध्वजारोहणानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक संचालक (माहिती) सुरेश पाटील यांच्यासह विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्रातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# दिव्यांगांसाठी 'सक्षम' ॲपचे लोकार्पण



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – : स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांग व्यक्तींसाठी 'सक्षम' ॲपचे लोकार्पण महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या ॲपमुळे दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच हयात प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी वारंवार म हापालिका कार्यालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही.

'सक्षम' ॲपच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना आवश्यक सेवा व सुविधांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि घरबसल्या घेता येणार आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दिव्यांग नागरिकांना सक्षम करण्याच्या दृष्टीने महापालिकेचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

### दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर व शैक्षणिक साहित्याचे वाटप

यावेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात समान संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

### विद्यार्थ्यांकडून देशभक्तीपर कार्यक्रमांचे सादरीकरण

स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सिम्फनी बँडने विविध देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. तसेच महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी मलखांब, तलवारबाजी तसेच विविध कौशल्यांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. दिव्यांगांसाठी 'सक्षम' ॲपचे लोकार्पण, दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर व शैक्षणिक साहित्याचे वाटप आणि विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर कला-कौशल्यांचे सादरीकरण यामुळे स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाला सामाजिक समावेशकता आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांची विशेष जोड मिळाली.

# वैजापूर मतदार पुनरीक्षण SIRमध्ये जिल्ह्यात प्रथम:,स्वातंत्र्य दिनी गौरव



वैजापूर, दि. १७ (प्रतिनिधी) – नुकत्याच संपूर्ण देशात पार पडलेल्या मतदार यादी पुनरीक्षण अभियानात (एसआयआर) वैजापूर तालुक्यातील अधिकार व बीएलओ यांनी उत्कृष्ट कर्तव्य करून मराठवाडा विभागात द्वितीय तर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळिवला यास्तव उप विभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी डॉ. अरूण जऱ्हाड,तहसीलदार सुनील सावंत, मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत,नायब तहसीलदार रामेश्वर महाजन,श्री. कुमावत व बीएलओ यांना स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहन नंतर शासनाच्या वतीने स्मृती चिन्ह व प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन व आभार प्रदर्शन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.या प्रसंगी पंचायत समिती सभापती श्रीमती शिंदे, उपसभापती सोनाली जाधव,जिप सदस्य संजय निकम,डॉ.बी.बी.शिंदे,अशोक पवार, श्री.बचे, मंडल अधिकारी जाधव,व शहरातील विविध कार्यालय प्रमुख व नागरिक बहु संख्येने उपस्थित होते.

# पिंपळे सौदागर येथे तिरंगा सन्मान सायकल रॅली



पुणे दि. १७ ( प्रतिनिधी ) – स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करण्यासोबतच नागरिकांना आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देण्याच्या उद्देशाने येथील उन्नती सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने 'तिरंगा सन्मानार्थ सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते . शेकडो नागरिक आणि सायकलप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही रॅली देशभक्तीमय वातावरणात उत्साहात संपन्न झाली.

उन्नती सोशल फाऊंडेशन, गोविंद ग्रुप, इंडो ॲथलेटिक सोसायटी आणि चॅलेंजर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीमध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटातील नागरिकांनी तिरंगा हातात घेत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. यावेळी भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई भिसे, आणि नगरसेविका अनिताताई काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमात सकाळच्या प्रसन्न वातावरणात तिरंगा हातात घेऊन शेकडो सायकलस्वार रॅलीत सहभागी झाले होते . लहान मुलांचा उत्साह, तरुणांचा जोश आणि ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे रॅलीला विशेष रंगत आली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# गणपती पुळे येथील दुर्घटनेतील मयतांच्या वारसांचा मदत वाटप



छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- रत्नागिरी जिल्ह्यातील गणपती पुळे येथील दुर्घटनेत बिडकीन ता. पैठण येथील पाच जणांचा मृत्यू झाला होता.

या मयतांच्या वारसांचा आज प्रभारी जिल्हाधिकारी अमोल येडगे व आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते मदतीचे वाटप करण्यात आले.

मुख्यमंत्री सहायता निधीतून या मदतीचे वाटप करण्यात आले. या दुर्घटनेत आदित्य संतोष राऊत, अनिकेत बंडू हिवराळे, आनंद राजू नरवडे, सोह्म, आदमाने, यश रामेश्वर कांबळे सर्व रा. बिडकीन यांच्या वारसांनाप्रत्येकी एक लाख रुपये मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.प्रत्येकी ५ लाख रुपये मदतीचे सानुग्रह अनुदान मयतांच्या वारसांना यावेळी देण्यात आले.

# सिडको बसस्थानकातील अस्वच्छतेवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची अधिकाऱ्यांना तंबी

## प्रवाशांच्या सुविधांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे निर्देश; बसस्थानकांच्या स्वच्छतेबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)-सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही सर्वसामान्य प्रवाशांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे एसटी बसस्थानकांवर प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. या सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कुचराई अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मंत्री प्रताप सरनाईक यांनी छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको बसस्थानकाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी बसस्थानकातील विविध सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. सार्वजनिक प्रसाधनगृहाची पाहणी करताना तेथील अस्वच्छता, अपुरी देखभाल तसेच कर्मचाऱ्यांचा अभाव त्यांच्या निदर्शनास आला. याबाबत प्रवाशांकडूनही तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

बासास्थानाकांच्या स्वच्छतेसाठी बाह्य संस्थांची नियुक्ती करण्यात आली असताना संबंधित संस्थांकडून निर्धारित निकषांनुसार काम करून घेणे आणि त्यावर सातत्याने देखरेख ठेवणे ही स्थानिक अधिकारी व प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, या मूलभूत कर्तव्याकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल मंत्री सरनाईक यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

'बाह्य संस्थेला काम दिले म्हणून अधिकाऱ्यांची जबाबदारी संपत नाही. प्रवाशांना प्रत्यक्षात स्वच्छता आणि आवश्यक सुविधा मिळत आहेत की नाही, याची नियमित पाहणी करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे. प्रवाशांच्या मूलभूत सुविधांबाबत उदासीनता अजिबात सहन केली जाणार नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या संस्थांकडून योग्य प्रकारे काम करून न घेणाऱ्या तसेच देखरेखीत कसूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. एसटीच्या प्रत्येक बसस्थानकावर प्रवाशांना स्वच्छ प्रसाधनगृहे, पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून



देण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले.

दरम्यान, मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकावर उपस्थित असलेल्या प्रवाशांशी थेट संवाद साधला. प्रवाशांच्या अडचणी, तक्रारी आणि अपेक्षा जाणून घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याबाबत माहिती घेतली. प्रवाशांनी मांडलेल्या समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बासास्थानकातील प्रसाधनगृहातील अस्वच्छता, कामात हलगर्जीपणा आणि एकंदर प्रवाशांना मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यामध्ये दाखवलेली उदासीनता याबद्दल विभाग नियंत्रक व संबंधित आगार व्यवस्थापक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी. तसेच पुढील ७ दिवसात या संदर्भात तातडीने अहवाल द्यावा असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दिलेले आहेत.

प्रवाशांच्या सेवेत असलेली 'लालपरी' केवळ प्रवासाचे साधन नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे एसटीच्या प्रत्येक बसस्थानकावर प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळालेच पाहिजे. यासाठी प्रशासनाने केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करावे, अशी स्पष्ट भूमिका मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी मांडली.

सिडको बसस्थानकातील पाहणीच्या निमित्ताने त्यांनी 'प्रवाशांच्या सुविधांमध्ये हलगर्जीपणा नको, जबाबदारी निश्चित करा आणि तातडीने सुधारणा करा' असा स्पष्ट संदेश एसटी प्रशासनाला दिला.

# सरकारी लेखा व कोषागारे विभागातर्फे आज एकदिवसीय कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारी लेखा व कोषागारे विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार दि. १८ रोजी सकाळी साडेदहा वा. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. सरकारी लेखा व कोषागारे विभागातील महत्त्वाच्या विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगर जिल्हा कोषागार अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. कार्यशाळेचा उद्देश सरकारी लेखा प्रणालीचे बळकटीकरण, डेटाची अचूकता सुनिश्चित करणे तसेच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची साक्षरता वाढविणे हा आहे.

# ब्रह्मवृंद वैभव वधू-वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- ब्रह्मवृंद वैभव वधू-वर सूचक केंद्र आणि श्री समर्थ राम मंदिर, समर्थ नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वधू-वर परिचय मेळावा नुकताच समर्थ नगर येथील श्री समर्थ राम मंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यास संपूर्ण महाराष्ट्रातून वधू-वर तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री समर्थ राम मंदिराचे अध्यक्ष श्री माणिकजी रत्नपारखी होते. प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी नागरी सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रवीण नांदेडकर, नगरसेविका सौ. सविताताई कुळकर्णी आणि नगरसेविका सौ. अमृताताई पालोदकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी योग्य वयात विवाह जुळवण्यासाठी अनावश्यक अटी-शर्ती टाळून विवाह प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती आणि त्यांच्या पालकांना एकाच व्यासपीठावर परिचयाची संधी उपलब्ध करून देणे हा अशा उपक्रमांचा महत्त्वपूर्ण उद्देश असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. अश्विनीताई लोटांगणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री दत्तात्रय यांनी केले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी श्री गोविंद गालफाडे, श्री सुधाकर कुळकर्णी, श्री रेणुकादास कुळकर्णी, श्री प्रविण महाजन, श्री सुनील मंडलिक, श्री दीपक कुळकर्णी, सौ. अश्विनी लोटांगणे आणि सौ. सुजाता मांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या वधू-वर तसेच पालकांनी मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वधू-वरांना परिचयाची आणि पालकांना परस्पर संवादाची संधी मिळाल्याने हा उपक्रम विवाह जुळविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरला.

# गारखेड्यातील सराईत गुन्हेगारांकडून युवकाचे अपहरण; विहिरीवर नेऊन कपडे काढून अमानुष मारहाण, व्हिडिओही बनवला

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- शहर परिसरात सराईत गुन्हेगारांची मुजोरी पुन्हा एकदा समोर आली आहे. एका युवकाचे जबरदस्तीने अपहरण करून त्याला एसआरपीएफ कॅम्प परिसरात नेऊन कपडे काढून अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मारहाणीचा व्हिडिओही आरोपींनी बनवला असून, या प्रकरणी तीन सराईत गुन्हेगारांविरुद्ध जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रिजवान शेख, आमेर पठाण आणि मेराज शेख (सर्व रा. गारखेडा) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

कारमधून उचलले, रिक्षात घालून विहिरीजवळ नेले मिळालेल्या माहितीनुसार, जाहेद गौस बागवान हा युवक १० ऑगस्ट रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास पुंजाबाई चौक येथे एका बंद कारमध्ये झोपलेला होता. या वेळी तिथे आलेल्या आरोपींनी त्याला जाब विचारत मारहाण केली आणि जबरदस्तीने रिक्षात डांबले. आरोपींनी त्याला एसआरपीएफ कॅम्पजवळील एका निर्जन विहिरीजवळ नेले. तिथे त्याचे सर्व कपडे काढून त्याला बेदम मारहाण करण्यात आली आणि या संपूर्ण क्रूर कृत्याचा व्हिडिओही शूट केला.

चालत्या रिक्षातून उडी मारून वाचवला जीव अमानुष मारहाणीमुळे जाहेद गंभीर जखमी झाला होता. दुसऱ्या दिवशी आरोपींनीच त्याला रुग्णालयात नेले. उपचारानंतर परतत असताना त्रिशरण चौक परिसरात जाहेदला त्याचे वडील रस्त्यावर दिसले. संधी साधत जाहेदने चालत्या रिक्षातून बाहेर उडी मारली आणि स्वतःची सुटका करून घेतली. पकडले जाण्याच्या भीतीने आरोपींनी रिक्षासह तिथून पळ काढला.

एकाला अटक, दोघांचा शोध सुरू या घटनेनंतर पीडित तरुणाच्या तक्रारीवरून शनिवारी (१५ ऑगस्ट) जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा; जलदूत बनून पाण्यासाठी चालूया

## जलसंधारण दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्यातील नागरिकांना आवाहन

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- आपला महाराष्ट्र समृद्ध आणि हिरवागार असावा, हे आपल्या सर्वांचे स्वप्न आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात 'जल संधारण दिन' साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना जल संधारणाच्या या जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

२१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकेथॉनमध्ये तरुणांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी रील्स स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत युवा पिढीने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

या ऐतिहासिक जल संधारण मोहिमेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या जाहिराती तसेच समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेला अधिकृत क्यूआर कोड स्कॅन करून नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

जलसंधारण ही केवळ राज्य शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असलेली लोकचळवळ आहे. त्यामुळे या जनजागृती अभियानात प्रत्येकाने सहभागी होऊन जल संधारणाचा संदेश घराघरात पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

'चला, एकत्र येऊया, जलदूत बनून पाण्यासाठी चालूया. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मूलमंत्राला जगवूया,' असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

# 'राजीव गांधी महाविद्यालयात' राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत तिरंगा रॅली

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'स्वतंत्र भारताचा उत्सव' तसेच 'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा' या अभियानांतर्गत आज भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन उत्साहपूर्ण वातावरणात तिरंगा रॅली काढली.

'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाविषयी आदर, देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांविषयी जनजागृती केली. प्रत्येक घरावर तिरंगा फडकावा आणि प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये राष्ट्रप्रेमाचा तिरंगा सदैव फडकत राहावा, हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी तिरंगा रॅलीचे संचालन केले. यावेळी जिल्हा समन्वयक डॉ. कालिदास फड यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. जयश्री पाटील, प्रा.अर्जुन चव्हाण, प्रा. गणेश कुऱ्हाडे, डॉ.रमेश कचरे, डॉ. नितीन मुळे, डॉ. सौरभ चव्हाण, डॉ. अतुल मोरे, डॉ. अमित राऊत डॉ. नानासाहेब लावंड, रामचंद्र घोडके, डॉ. ललित गोल्ड, प्रा. प्रशांत माटे, डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात, प्रा. तन्मय भावसार, डॉ. किशोर काळे, प्रा. ज्ञानेश्वर कोठुळे, प्रा. प्रकाश बांगर, तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रसन्न वैद्य शिवकुमार मुक्तापुरे भगवंत देशपांडे, अविनाश साळवे,रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, अलका कुलकर्णी, सुनीता पारेकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील नागरिकांना 'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा' या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. राष्ट्रध्वज हा केवळ कापडाचा तुकडा नसून देशाची अस्मिता, स्वातंत्र्य, त्याग, शौर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे, हा विचार विद्यार्थ्यांनी आपल्या घोषणांमधून आणि सहभागातून प्रभावीपणे मांडला.

स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करत नव्या पिढीमध्ये देशभक्तीची भावना रुजविणे, संविधानिक मूल्यांचा आदर निर्माण करणे आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. महाविद्यालय परिसरात तिरंग्याच्या सन्मानाने आणि देशभक्तीच्या उत्साहाने भारलेले वातावरण निर्माण झाले होते.

'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा' या घोषणेने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देत तिरंगा रॅली उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली.

# शासनाच्या स्वदेशी वस्तूंच्या प्रदर्शनाला छत्रपती संभाजी नगरात उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- भारतीय हस्तकला, हातमाग आणि स्वदेशी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एमआयडीसी चिकलठाणा येथील सागर रिसॉर्ट येथे आयोजित 'स्वदेशी फॅशन अँड लाइफस्टाईल एक्स्पो २०२६' ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तीन दिवसांच्या या प्रदर्शनाची आज उत्साहात सांगता झाली.

केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालयाच्या सहकार्याने १४ ते १६ ऑगस्टदरम्यान आयोजित या प्रदर्शनात देशाच्या विविध भागांतून आलेले कारागीर, विणकर, महिला उद्योजक आणि हस्तकला कलाकार सहभागी झाले होते. विविध राज्यांतील पारंपरिक हस्तकला, हातमाग वस्त्रे, फॅशन व लाइफस्टाईल उत्पादनांचे वैविध्य हे प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरले.

प्रदर्शनात मधुबनी, पत्तचित्र, पिचवाई, सोहराय, ऐपन, पाथणी, खादी तसेच ज्युट उत्पादनांसह विविध पारंपरिक कलाकृती व वस्त्रांचे दालन ग्राहकांसाठी उपलब्ध होते. देशाच्या विविध भागांतून आलेल्या कारागिरांच्या कलाकौशल्याला प्रत्यक्ष पाहण्याची आणि त्यांच्या उत्पादनांची थेट खरेदी करण्याची संधी ग्राहकांना मिळाली.

प्रदर्शनात खरेदी सोबतच तीन हजार रुपयांच्या वरील उत्पादने खरेदी केलेल्या ग्राहकांचा लकी ड्रॉ मध्ये समावेश करून त्यांना भेट वस्तू देण्यात आल्या. त्यामुळे ग्राहकांमध्येही समाधान असून अशा प्रकारचे प्रदर्शन पुन्हा पुन्हा भरायला हवे, अशी इच्छाही चोखंदळ ग्राहकांनी यावेळी व्यक्त केली. प्रसिद्ध उद्योजिका शिखा अजमेरा यांच्या संकल्पनेतून आयोजित या एक्स्पोमध्ये केवळ खरेदीपुरते मर्यादित न राहता ग्राहक व विशेषतः महिला आणि मुलांसाठी विविध मनोरंजनात्मक व कौशल्यवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. फॅशन शो, लहान मुलांसाठी टॅलेंट हंट, गणेशहार व आसन निर्मिती कार्यशाळा, लोकर रांगोळी कार्यशाळा आदी उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच संगीत व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रदर्शनाची रंगत वाढवली. सोबतच तीन दिवस चाललेल्या विविध मनोरंजनात्मक स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षिसे देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. तीन दिवसांच्या या प्रदर्शनात मोठ्या संख्येने नागरिकांनी भेट देत भारतीय हस्तकला व हातमाग उत्पादनांची खरेदी केली. 'स्वदेशी खरेदी करा, कारागिरांच्या कलेला बळ द्या' या संदेशाने प्रदर्शनाची उत्साहपूर्ण सांगता झाली.


दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE IN MY NAME FOR PASSPORT ISSUANCE.
**OLD NAME -** SAYYAD JAVERIYA RAZEK ALI
**NEW NAME -** JAVERIYA SAYYED RAJEK ALI
**ADDRESS -** NAVINGAON GAOTHAN, BIDKIN,BIDKIN, PO-BIDKINGAON, DIST-AURANGABAD- 431105

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE IN MY NAME FOR PASSPORT ISSUANCE.
**OLD NAME -** RAJEK ALI SAYYAD ALI SAYYAD
**NEW NAME -** SAYYAD RAJEKALI SAYYADALI
**ADDRESS -** NAVINGAON VASTI, BIDKIN, PAITHAN, PO-PAITHAN, DIST-AURANGABAD-431107

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME :** FAIZAN KHALIL AHMED SHAIKH
**NEW NAME :** FAIZAN KHALEEL AHMED
**ADDRESS :** H N 1-13-15 PLOT NO 80 OPP FAIZAN MASJID AREF COLONY AURANGABAD MAHARASHTRA 431001

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE IN MY NAME FOR PASSPORT ISSUANCE.
**OLD NAME -** SAFIYA FARHAD RAJIK ALI SAYYAD
**NEW NAME -** SAFIYA SAYYAD RAJEK ALI
**ADDRESS-** NAVINGAON VASTI, BIDKIN, PAITHAN,, DIST-AURANGABAD,431105


(पान १ वरुन)

## गांधी परिवारावर टीका करणे म्हणजे...

कोणताही नैतिक अधिकार नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

गांधी कुटुंबाने देशासाठी दिलेले बलिदान आणि योगदान मोठे आहे, असे सांगत पटोले यांनी भाजपला खडेबोल सुनावले. ''स्वतःचा इतिहास लपवून केवळ गांधी परिवाराला लक्ष्य करण्यापेक्षा, भाजपच्या लोकांनी आधी स्वतःचे देशप्रेम किती आहे हे तपासून पाहावे. दुसऱ्यांवर नुसते बोलण्यापेक्षा कृतीतून देशभक्ती सिद्ध करावी,'' असा इशारा नाना पटोले यांनी दिला.

## पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या...

भविष्यात अधिक सुखकर होणार आहे.

पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी फोडण्यासाठी नितीन गडकरी यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची आणि निधीची घोषणा केली आहे. यात हडपसर-यावत मार्गासाठी ५,२६५ कोटी रुपये, तळेगाव-चाकण-शिक्रापूर या ५३ किमी टप्प्यासाठी ४ हजार कोटी रुपये, तर शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या १९२ किमी मार्गासाठी १५ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याशिवाय, खेड ते नाशिक फाटा (३० किमी) मार्गासाठी ८ हजार कोटी, रावेत ते नऱ्हे मार्गासाठी ६ हजार कोटी आणि पुणे ते सोलापूर महामार्गासाठी ८ हजार कोटी रुपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. देशातील रस्ते जाळ्याच्या विस्ताराबाबत माहिती देताना गडकरींनी सांगितले की, अटल सेतू ते पागोटे चौक आणि तिथून पुढे पुण्यापर्यंत एक नवीन आणि वेगवान रस्ता विकसित केला जात आहे. या नवीन मार्गावरून थेट बंगळुरूपर्यंतचा प्रवास अवघ्या पाच तासांत पूर्ण करता येईल, अशी आधुनिक व्यवस्था उभारली जात आहे. तसेच, शिळफाटा ते पनवेल आणि जुन्या पुणे-मुंबई महामार्गाच्या सुधारणेवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, या रस्ते विकासाच्या कामांसाठी तब्बल ६० हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

## अन्यथा २९ ऑगस्टनंतर सरकारची...

असून काही अभ्यासक, समन्वयक यांना बोलायचे आहे, हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे आता इथून पुढे त्यांना मराठ्यांच्या प्रश्नाविषयी बोलता येणार नाही.''

कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरही जरांगे पाटील यांनी सरकारला इशारा दिला. ते म्हणाले, ''५८ लाख नोंदीचे कुणबी प्रमाणपत्र, व्हॅलिडिटी पाहिजे. एकही नोंद कमी केली तर सरकार पाडणार. भुमरे, शिरसाट, बावनकुळे यांनी मराठ्यांचे तळतळाट घेतला. याचिका टाकल्या, आता फोटो बाहेर येत आहेत.''


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Chhatrapati Sambhajinagar, on behalf of MSETCL (the Employer) is hereby inviting online bids from reputed Contractors, registered on MAHATRANSCO SRM E-Tendering Website for the following works:

| S.N. | Particulars | RFx No. | Other Details |
|---|---|---|---|
| 1 | Bi-Annual Maintenance Contract for the Work of Testing of EHV Grade Transformer Insulating Oil, by NABL accredited Mobile Testing Laboratory, On-site, of Power Transformers & ICTs installed at various S/stns. under EHV (O&M) Circle, Chhatrapati Sambhajinagar. | AMC - AMC - Testing of Transformer Oil RFx. No. 7000041167 | Tender Amount: Rs. 91,65,602.60 EMD Amount Rs. 91,656.03 |

Tender available at- **https://srmetender.mahatransco.in/**, Due date for Online submission of E-Tender is up to Dt. 02.09.2026 up to 0:00 Hrs. **All future amendments to this tender will be published on MSETCL's website only.**

**Contact Person:** Executive Engineer (O): Phone No. 8554995030, Email ID- ee2100@mahatransco.in

**Sd/**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, MSETCL,**
**Chhatrapati Sambhajinagar**